Historicity Research Journal
Volume 1 | Issue 6 | Feb 2015 ISSN:- 2393-8900

Research Article

# शिवकालीन जमीन महसूल व्यवस्था

**प्रा.डॉ. विश्वनाथ पवार**
**छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.**

**प्रस्तावना:**

शिवकाळात शेती हा जीवन जगण्याचा मुख्य मार्ग होता. बहुतांशी लोक शेतीवर अवलंबून होते. जमीन महसूल हा राज्याच्या उत्पन्नाचा मुख्य आधार होता. कृषी व्यवस्था रयतेच्या हिताची होण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी जमीनदारांचे, वतनदारांचे, जमिनीबाबतचे हक्क काढून घेतले. जमीनदार पद्धतीऐवजी त्यांनी 'रयतवारी' पद्धतीचा अवलंब केला. रयतवारी पद्धतीमुळे राजा व रयत यांच्यामध्ये सलोखा निर्माण झाला. छत्रपती शिवाजी महाराजांनी जमिनीची प्रतवारी केली, जमिनीची मोजणी केली आणि यानंतर पीक पाहणी करून सारा आकारणी केली.

**जमीन धारण पद्धती:**

जिच्या सभोवती किर्दसार वहितीला योग्य जमीन आहे आणि जिच्यामध्ये मातब्बर शेतकरी व पुष्कळसे मजूर आहेत. अशा वस्तीला 'गाव' संबोधले जाई. गावाच्या हद्दीला 'शिव' संबोधले जाई. गावाचे स्वभावत: दोन भाग पडतात. एक 'पांढरी' 'गावपांढर' किंवा गावठाण आणि दुसरा भाग 'काळी' काळी आई किंवा शिवार होय.[१] शिवकाळात भूधारणेच्या/ जमीनधारणेच्या मुख्यत्वे तीन पद्धती होत्या. पहिल्या पद्धतीस मिराशी किंवा तालवाहिका असे संबोधले जाई. मिराशी जमीनधारणा पद्धतीमध्ये जमिनीची मालकी जमीन कसणाऱ्यांकडे (मिरासदारकडे) असे. ही मालमत्ता वंशपरंपरागत व विक्रीलायक होती.दुसऱ्या पद्धतीत उपरी जमीनधारणा पद्धत म्हटले जाई. या पद्धतीत शेतकरी दुसऱ्याच्या मालकीची जमीन खंडाने करत. त्यांना शेतमजूर किंवा स्वत:चे स्थान नसल्यामुळे उपरे म्हटले जाई. तिसऱ्या पद्धतीमध्ये लोकोपयोगी कामे करून खेडेगावाच्या गरजा भागविणाऱ्या कारागीरांस/ बलुतेदारांस व ग्रामअधिकाऱ्यास वतनी जमीन दिली जाई.[२]

**स्वराज्याचे प्रादेशिक विभाग:**

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या प्रशासकीय सोयीसाठी स्वराज्यातील प्रदेशाचे चार प्रादेशिक विभाग केले होते. एक उत्तर कोकण व साल्हेर ते पुण्यापर्यंतचा प्रदेश याचे सरसुभेदार मोरो त्र्यंबक पिंगळे होते. दुसरा विभाग पुणे ते बेळगाव, धारवाड पर्यंतचा प्रदेश असून याचे सरसुभेदार दत्ताजी त्र्यंबक होते. तिसरा विभाग दक्षिण कोकण व कारवार बेदूनर पर्यंतची किनारपट्टी असून याचे सरसुभेदार अण्णाजी दत्तो होते. आणि चौथ्या विभागात म्हैसूर व तामिळनाडूतील प्रदेश असून या विभागावर सरसुभेदार म्हणून हरजीराजे महाडिक कार्य पहात होते.[३]

**जमिनीची प्रतवारी:**

छत्रपती शिवाजी महाराजांनी जमिनीच्या कसाप्रमाणे अव्वल, दुम, सिम व चारहम अशी प्रतवारी केली. त्यास 'प्रतबंदी' हा शब्दप्रयोग वापरला. कसबा रहिमतपूर, परगणे वाईचे १६७५ चे जमावबंदी पत्रक उपलब्ध आहे. त्याप्रमाणे रहिमतपूर मध्ये एकंदर जमीन ११० चावर ३ बिघे (खडकाळ बाद १९ चावर, उरली जमीन ९१ चावर ३ बिघे) होती. त्यात अव्वल ५८ चावर,दूम २५ चावर व सिम ७ चावर अशी प्रतबंदी होती. सरकारी सारा टक्के व गलाकैली मिळून सुमारे ४८६० रुपये दिला.[४] अण्णाजी दत्तोंच्या एका पत्रात जमिनीच्या तेरा प्रकारांचा उल्लेख केलेला आहे.[५] एका यादीमध्ये भात पिकविणाऱ्या जमिनीचे वर्गीकरण अव्वल,दुम, सीम, चारहम, बाविल, रहू, खारी,कदायत, व तुरवट इतक्या प्रकारे केले आहे.[६] परंतु सामान्य व्यवहारात मात्र हे वर्गीकरण अव्वल धूम सीम व कधीकधी चार हम अशाप्रकारे आढळते.[७] मराठा काळात जमिनीच्या प्रतवारी साठी बिघावणी हा शब्दप्रयोग वापरला जाईल.

**जमिनीची मोजणी:**

जमिनीची प्रतवारी झाल्यानंतर मोजणी केली जाई, जमीन मोजण्यासाठी शिवशाही काठीचा वापर केला जाई. शिवशाही काठी बद्दल कृष्णाजी अनंत सभासद म्हणतात.

''पांच हात व पांच मुठीची काठी
हात चौदा तसूचा असावा
हात व मुठी मिळून बैंशी तसूंची लांबी काठीची
वीस काठ्या औरस चौरस त्यांचा बिघा एक
बिघे एकशे वीस त्यांचा एक चावर

अशी जमीन मोजून आकारुन गांवची गांवास मोजून चौकशी केली.''[८] जमिनीचे मोजमाप होऊन जमिनीचे बिघे निश्चित केले जातात यालाच चावराणा आणि चकबंदी म्हटले जाई. बिघे ठरले म्हणजे अमुक चावर वा चाहूर हे ठरले आणि त्यांच्या सीमा ठरल्या म्हणजे चकबंदी झाली असे समजले जाई.[९] शिवकाळात सारा निश्चित करण्याचे तीन प्रयत्न झाले. १६३६ साली दादोजी कोंडदेवांनी पुणे — मुठे,मावळ या परगण्यांत प्रथम प्रयोग केले. १६४८—४९ सली मोरो त्रिंबक पिंगळे यांनी शिरवळ परगण्याचा सारा निश्चित केला. १६७८ साली अण्णाजी दत्तोने रोहिड खोऱ्यात सारा निश्चित करण्याचा प्रयोग केला.[१०] शिवकाळात गाव व त्याचा शिवार किती चावरचा आहे. याच्या नोंदी सापडतात. जमीन मोजणी नंतर त्याची प्रतवारी ठरली. मिरासदार कुळे रयताव्याने शेती करू लागली. शेतकऱ्यांच्या नावाच्या सनदा तयार झाल्या. सनदामधून शेताचा उल्लेख होऊन 'जमीनझाडा' गाववार तयार झाला.

**पीक पाहणी:**

दादोजी कोंडदेव, मोरोपंत पिंगळे, अण्णाजी दत्तो यांनी जमिनीची पाहणी करून, प्रतवारी ठरवून, पीक पाहणी करून, सारा निश्चित करण्याचे कार्य केले. सुभा मावळांतील रोहिडा खोऱ्याच्या शेतकऱ्यांनी छ.शिवाजी महाराजांस विनंती केली की, शेतजमीन मोजून सारा ठरविण्यात यावा. हे काम महाराजांनी अण्णाजी दत्तो यांस दिले.[११] अण्णाजी दत्तोने परगण्यातील अधिकाऱ्यांच्या माध्यमातून जमिनीचे प्रतवारीचे पत्रक तयार केले. ही प्रतवारी म्हणजे 'बिघावणी' होय. यानंतर कोणत्या जमिनीत कोणते पीक येते व त्याचे उत्पन्न काय होते याचे पत्रक तयार केले. ते म्हणजे 'पीक पाहणी' होय.

बिघावणी व पीक पाहणी झाल्यानंतर याबाबतची पत्रके अण्णाजी दत्तोकडे येत. मग अण्णाजी दत्तो या पत्रकांची छाननी करून परगण्याच्या महसूल दर निश्चित करत असत.

रयतेने जर या महसूल आकारणी बद्दल असमाधान व्यक्त केले. आणि पुन्हा पाहणी आकारणी करण्याचा अर्ज केला तर पुन्हा आकारणी होत असे. आणि हे काम रयतेच्या मनपसंत झाले म्हणजे सारा (धारा) गोळा करण्यास जड जात नसे. पण दोनदा आकारणी करूनही रयतेची त्या कामात पसंती मिळाली नाही तर ते काम अण्णाजी दत्तोपंतांनी देशमुख, कुलकर्णी, मुकादम पोख्तर व चार रयता हयांच्या मेळाव्यावर सोपवून त्यांना शेतीच्या सिरी बसवून साक्ष पाहून आकार करण्याचे आदेश दिले असल्याचे दिसून येते.

**सारा आकारणी:**

अण्णाजी दत्तोने परगण्यातील अधिकाऱ्यांच्या माध्यमातून जमिनीचे 'प्रतवारीचे' पत्रक तयार केले. त्यानंतर 'पीकपाहणी' हे पत्रक तयार केले. ही पत्रके अधिकारी अण्णाजी दत्तोकडे पाठवीत असत. अण्णाजी दत्तो या पत्रकांची छाननी करून परगण्याचा महसूल दर निश्चित करत असत. इतिहासकार डॉ. बाळकृष्ण यांनी अण्णाजी दत्तोंच्या जमीन मोजणी कामाचे कौतुक करताना 'लोकांची धारा पद्धत' अशा शब्दप्रयोग केला आहे.[१२] इसवी सन १६७८ मध्ये संगमेश्वर मधील देशमुख, देशकुलकर्णी, मुकादम आणि पाटील यांना एक पत्र लिहून त्यांनी प्रत्येक गावाला भेट देण्याचे आदेश दिले. या अधिकाऱ्यांनी गावांमध्ये जाऊन नीट पाहणी व चौकशी करून जमिनीची प्रतवारी ठरवावी, पीक पाहणी करून त्यांच्या नोंदी घ्याव्यात आणि जमीन महसूल निश्चित करावा असे आदेश दिले होते. यानंतर त्यांनी आपले अहवाल अण्णाजी दत्तोना पाठवायचे होते. अण्णाजी दत्तोंनी असेही कळविले होते की परीक्षणाखातर आपण तीन निरनिराळ्या विभागातील म्हणजेच डोंगराळ, पाणथळ आणि काळया कसदार जमीन असणाऱ्या अशा तीन गावात आपण स्वत: पाहणी करणार आहोत. अशा रीतीने मोजणी, पीक पाहणी व सारा आकारणी ही कामे होत असत. ही कामे अण्णाजी दत्तो यांनी इतक्यात चोख रीतीने बजावली म्हणून मराठेशाहीत यांस 'अण्णाजी पंतांचा धारा' हा शब्दप्रयोग रूढ झाला.[१३]

सारा (धारा) आकारणीच्या प्रमाणाबाबत छत्रपती शिवाजी महाराजांचे समकालीन महाराजांच्या जीवनातील अनेक घटनांचे साक्षीदार असलेले कृष्णाजी अनंत सभासद म्हणतात,''बीघेयास पिकाचा आकार करून पाच तक्षिमा (भाग) पिकाच्या करून तीन तक्षिमा रयतेस द्याव्या, दोन तक्षिमा दिवाणात(सरकारात) घ्याव्या, येणेप्रमाणे रयतेपासुन घ्यावे.''[१४] शिवकालीन कागदपत्रात या साऱ्याचा उल्लेख 'राजभाग पचादुई' असा करण्यात आल्याचे दिसते.

**सारांश:**

छत्रपती शिवाजी महाराजांनी जमिनीची मोजणी केली, तिची प्रतवारी केली. पीक पाहणी करून योग्य सारा आकारला. रयतेला जमिनीचे हक्क दिले. महसूल मक्तेदारीची पद्धती बंद केली. महसुलाची निश्चिती व अंमलबजावणी केली. जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली आणण्याचा प्रयत्न केला. राज्य आबादन केले.

**संदर्भसूची:**

१) आत्रे त्रिं. ना, 'गाव—गाडा', वरदा प्रकाशन पुणे, पृ.1
२) राजवाडे वि.का (संपा.) मराठयांच्या इतिहासाची साधने, पुणे खंड 16 पृ.22
३) खोबरेकर वि.गो, महाराष्ट्राचा इतिहास. मराठा कालखंड (भाग १) 'शिवकाल' महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, पृ.555—556

४) पाठक अरुणचंद्र, सातारा जिल्हा गॅझेटिअर, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, पृ.598
५) खोबरेकर वि.गो, उपरोक्त, पृ.556
६) भा.इ.सं.मं. वार्षिक संमेलन 1835, पृ. 323–327
७) पाठक अरुणचंद्र, उपरोक्त, पृ.598
८) साने का.ना. (संपा.) सभासद बखर, पृ.२९
९) कुलकर्णी अ.रा, शिवकालीन महाराष्ट्र पृ.62
१०) कुलकर्णी अ.रा, 'शिवकालीन महाराष्ट्र' मराठयांचा इतिहास, खंड १, १९८४, पृ.३४३
११) राजवाडे वि.का.,(संपा.) मराठयांच्या इतिहासाची साधने, पुणे खंड 16 पृ.340
१२) स्टोरिओ द मोगर, भाग 3, पृ.500
१३) राजवाडे वि.का.,(संपा.) उपरोक्त, पृ.340
१४) साने का. ना. (संपा.) उपरोक्त, पृ.34